# ८. सामाजिक परिवर्तन

८.१ सामाजिक परिवर्तन : अर्थ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये
८.२ सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत ठरणारे घटक

## प्रस्तावना

समाज नेहमीच स्थिर असतो का? इ.स.१९९१ पूर्वी जशा रोजगाराच्या संधी उपलब्ध होत्या त्याचप्रमाणे आताही आहेत का? नाशिक आणि पुण्यातील दळणवळण व्यवस्था पूर्वीप्रमाणेच आहे का? दशकांपूर्वी असणारी राजकीय परिस्थिती आताही तशीच दिसून येते का? या सर्व प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच आहेत.

संपूर्ण मानवी समाज आणि त्यांची संस्कृती या गतिशील आणि परिवर्तनशील आहेत. या पाठामध्ये आपण सामाजिक परिवर्तनाचा अर्थ, त्याची वैशिष्ट्ये आणि सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत असणारे घटक समजावून घेणार आहोत.

## ८.१ सामाजिक परिवर्तन: अर्थ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये

### ८.१.१ व्याख्या

*(१) हॅरी जॉन्सन :* "मूलभूत अर्थाने सामाजिक संरचनेमध्ये होणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

*(२) हॉर्टन आणि हंट :* "सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील सामाजिक रचना आणि सामाजिक संबंध यांतील बदल होय."

*(३) किंग्जले डेव्हिस :* "केवळ समाजाच्या संघटनात म्हणजेच समाजाच्या संरचनेत आणि कार्यात होणाऱ्या बदलांनाच सामाजिक परिवर्तन असे म्हणतात."

वरील सर्व व्याख्यांमधून असे दिसून येते की, सामाजिक परिवर्तनाचा संबंध रचनात्मक-कार्यात्मक परिवर्तनाच्या दृष्टिकोनाशी आहे. यातून असे दिसून येते की समाजाच्या रचनेतील परिवर्तनाचा त्यांचा एकमेकांशी असणाऱ्या परस्परसंबंधावर प्रभाव पडतो.

### ८.१.२ सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप

मानवी समाज परिवर्तनशील आहे. निसर्गामध्ये जसे सतत परिवर्तन होत असते त्याचप्रमाणे मानवी समाजामध्येही ते दिसून येते. समूह मग तो आदिवासी, ग्रामीण, शहरी, मागास, प्रगत किंवा संमिश्र, कसाही असला तरी तो परिवर्तन अनुभवत असतोच. परिवर्तनाचे गुणधर्म आणि परिवर्तनाची दिशा या समाजपरत्वे भिन्न असू शकतात. परंतु परिवर्तन हे अपरिहार्य असते. परिवर्तन हे संथ किंवा जलद असू शकते; परिवर्तनाचे परिणाम हे सकारात्मक/रचनात्मक किंवा नकारात्मक असू शकतात. परिवर्तन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

वरील परिच्छेदामध्ये आपण सामाजिक परिवर्तनाचे 'गुणधर्म', त्याची 'दिशा' आणि त्याची 'गती' या गोष्टींचा उल्लेख केला. या सर्व संज्ञाची सविस्तर माहिती घेऊया.

सामाजिक परिवतर्नाची काही मूलभूत वैशिष्ट्ये असतात. सामाजिक परिवर्तनाशी संबंधित ज्या काही संज्ञा आहेत त्या जाणून घेतल्यावर याची चर्चा करता येईल.

काही वेळा परिवर्तन हे एका क्रमाने आणि एका ठरावीक दिशेने एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत होत असते. उदा., ऑगस्ट कॉम्त यांनी मानवी विचारांच्या तीन अवस्थांचा सिद्धांत सांगितला आहे. हे एकरेषीय परिवर्तनाचे उदाहरण आहे. पण

परिवर्तन हे कायम एका सरळ रेषेतच होईल असे नाही, ते बहुरेषीय असू शकते. म्हणजे परिवर्तन हे एकाच वेळी अनेकविध दिशांनी किंवा मार्गांनी घडू शकते.

तसेच परिवर्तन हे चक्रीय असू शकते. उदा., फॅशन जगतात ही सामान्य बाब आहे. काही वर्षांपूर्वी लोकप्रिय असलेल्या वेशभूषा आणि केशभूषेच्या पद्धती काही वर्षांनी पुन्हा प्रचलित आणि लोकप्रिय होतात.

**उपक्रम – १**

**"पंक" केशरचनेचा इतिहास जाणून घ्या.**

परिवर्तनाची गती ही सुद्धा वेगवेगळी असते. अर्थातच सामाजिक परिवर्तनाची संकल्पना समजून घेताना हे लक्षात ठेवले पाहिजे की नैसर्गिक शास्त्रातील अचूक मापन पद्धतींप्रमाणे परिवर्तनाची गती अचूकपणे मोजणे शक्य नाही. मात्र, परिवर्तन हे संथ किंवा जलद गतीने होत असते हे निश्चितपणे ठरवता येऊ शकते. संथ किंवा जलद या संज्ञा तुलनात्मक आहेत.

सामाजिक परिवर्तन ही संज्ञा सामाजिक संस्थांमध्ये संरचनात्मक किंवा कार्यात्मक होणाऱ्या बदलांसंदर्भात वापरण्यात येते. उदा., शासन, शिक्षण, अर्थव्यवस्था, विवाहसंस्था, कुटुंब, धर्म इत्यादी.

या दृष्टिकोनालाच संरचनात्मक कार्यवाद असे म्हणतात. समाजाचे कार्य कशाप्रकारे चालते हे पाहण्याची ही एक पद्धत आहे. हा एक व्यवस्थात्मक दृष्टिकोन आहे. ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांच्या जैविक समानतेच्या सिद्धांतामध्ये संरचनात्मक प्रकार्यवादी विचाराची मुळे सापडतात. या सिद्धान्तामध्ये त्यांनी समाज व मानवी शरीर यांची तुलना केली आहे.



हर्बर्ट स्पेन्सर

मानवी शरीराची स्वतंत्र रचना असते. त्यात शरीराचे विविध अवयव, या प्रत्येक अवयवाची स्वतःची अशी एक कार्यपद्धती असते. कार्यांचा संच असतो, त्याचप्रमाणे मानवी समाजाची एक स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण रचना असते. समाजाचे वेगवेगळे घटक असतात. हे घटक एकमेकांशी संबंधित व एकमेकांवर अवलंबून असतात.

इथे आपण एका उदाहरणाचा विचार करू. आपल्या शरीरातील सर्व अवयव बहुतांश वेळी व्यवस्थित कार्य पार पाडतात. पण कधी कधी काही अवयव अकार्यक्षम होतात. उदा., जर तुमची कबड्डीची स्पर्धा असेल परंतु त्याचवेळी तुमची तब्येत बिघडली तर तुम्ही तुमच्या खेळावर लक्ष केंद्रित करू शकत नाही. तुम्हांला पूर्ववत होण्यासाठी विश्रांती किंवा उपचाराची गरज असते.

त्याचप्रमाणे समाजव्यवस्थाही काही वेळेस अकार्यक्षम होत असते. त्यामुळे मानवी समाजाला समाजामध्ये स्थिरता, समतोल आणि समानता आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. आपण पुन्हा एमिल दुरखीम यांच्या 'प्रमाणकशून्य आत्महत्या' याचा सदंर्भ घेऊ. ज्या वेळेस प्रमाणके, मूल्ये यांचा अभाव असतो, अशा वेळी आत्महत्येचा विचार व्यक्तीच्या मनात येऊ शकतो.

सामाजिक संस्था जसे की शिक्षण, शासन आणि अर्थसंस्था या सामाजिक व्यवस्थेमध्ये समाविष्ट

होतात. या संस्था मानवी आचरणांचे नियमन करतात, भूमिकांचे वाटप करतात, संसाधने पुरवतात. बदलत्या कालखंडानुसार व्यक्तींच्या बदलत्या सामाजिक भूमिकांचा देखील सामाजिक परिवर्तनात समावेश होतो. अलीकडच्या काळातील माहितीच्या युगात असलेली शिक्षकाची भूमिका ही हजारो वर्षांपूर्वी वैदिक काळात असणाऱ्या शिक्षकापेक्षा कैकपटींनी वेगळी आहे. शाळांची व्याप्ती, परिसर, विद्यार्थी, शिक्षणाची साधनसामग्री, शैक्षणिक तत्त्वज्ञान, शिकवण्याची आणि मूल्यांकनाची पद्धती या सर्वांमध्ये जाणवण्याइतका बदल झालेला दिसतो.

समाज ही अशी व्यवस्था आहे ज्यात वेगवेगळे घटक समाविष्ट असतात. या व्यवस्थेत त्या घटकांमध्ये परस्परसंबंध असतो. सामाजिक संरचना ही एका जैविक व्यवस्थेप्रमाणे असते. संस्था आणि समूह हे घटक कायम कोणत्या ना कोणत्या परिवर्तनातून जात असतात. समाजामध्ये कायम संरचनात्मक बदल दिसून येतात.

उदा., कुटुंबाच्या आकाराचा संरचनेच्या दृष्टीने विचार केला तर असे दिसून येते की, एकत्र कुटुंबपद्धतीत अमूलाग्र बदल होत आहेत. तसेच कुटुंब व्यवस्थेच्या कार्यात्मकतेमध्ये देखील बदल झालेले दिसून येतात. पूर्वीच्या काळी शिक्षण हे कुटुंबाचे कार्य होते. परंतु आजच्या काळात ते शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ यांमधून देण्यात येते.

सामाजिक परिवर्तन ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यामध्ये सामाजिक परिवर्तनाची दिशा, सामाजिक परिवर्तनाची पद्धत, सामाजिक परिवर्तनाचे स्रोत, सामाजिक परिवर्तनाची कारणे आणि सामाजिक परिवर्तनाचे परिणाम या सर्वांचा अंतर्भाव होतो. कालानुरूप मानवी जीवनामध्ये होणारे बदल म्हणजेच परिवर्तन होय.

### ८.१.३ सामाजिक परिवर्तनाची वैशिष्ट्ये

**(१) सार्वत्रिकता :** सर्व मानवी समाजामध्ये परिवर्तन घडून येते. यामध्ये लोकसंख्या, सामाजिक मान्यता, संसाधने, पोशाख, रीतीरिवाज, भूमिका, संगीत, कला, स्थापत्य इत्यादींचा अंतर्भाव होतो. सामाजिक परिवर्तन हे सार्वत्रिक आहे. हे प्रत्येक ठिकाणी दिसून येते. हे परिवर्तन एकसमान नसून त्याच्या गतिमानतेमध्ये भिन्नता दिसून येते. तरीही बदल अपरिहार्यपणे होत असतो.

**(२) सतत चालणारी प्रक्रिया :** समाज हा अविरत प्रवाहाच्या स्थितीत असतो. मानवी समाजाच्या निर्मितीपासून, आदिम समूहांपासून ते आजच्या प्रगत मानवी अवस्थेपर्यंत समाजात सतत बदल सुरू आहेत.

**(३) कालबद्धता :** सामाजिक परिवर्तन हे कालबद्ध असते. नवीन कल्पनांचा शोध, बदल आणि विद्यमान घटकातील नूतनीकरण आणि जुनाट पद्धती सोडून देणे याला वेळ लागतो. सामाजिक परिवर्तन झपाट्याने होत नाही, तर परिवर्तनासाठी वेळ लागतो. सामाजिक परिवर्तनाची गती ही स्थानपरत्वे, कालपरत्वे आणि विशिष्ट सामाजिक संदर्भानुसार बदलत जाते.

**(४) आंतरक्रियात्मक प्रतिक्रियांची साखळी :** एखादा घटक हा ठरावीक परिवर्तनासाठी कारणीभूत ठरू शकतो. परंतु हा घटक बऱ्याचदा इतर घटकांशीही संबंधित असतो. शारीरिक, जैविक, तांत्रिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि इतर घटक हे एकत्रितरीत्या सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत ठरू शकतात. हे सामाजिक घटनांच्या परस्परावलंबित्वामुळे घडते. उदा., शाळेच्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या फीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या नोंदणीवर होतो. याचा दूरगामी परिणाम म्हणजे

शिक्षण व्यवस्थेतील मोठ्या प्रमाणावर होणारी विद्यार्थ्यांची विशेषतः विद्यार्थिनींची गळती होय.

**(५) तटस्थता :** सामाजिक परिवर्तन या संज्ञेमध्ये मूल्य निवड नसते. एक घटना म्हणून ते नैतिक किंवा अनैतिक असे काही नसते. ते नैतिकदृष्ट्या तटस्थ असते. सामाजिक परिवर्तन ही एक वस्तुनिष्ठ संज्ञा आहे.

**(६) अल्पकालीन व दीर्घकालीन परिवर्तन :** काही सामाजिक परिवर्तनाचे परिणाम हे तत्काळ दिसून येतात तर काहींचे परिणाम हे काही वर्षे/ दशकांनी दिसून येतात. याचे एक उदाहरण म्हणजे एखाद्याकडे मनोरंजनाची नवीन उपकरणे खरेदी करण्याची क्षमता असेल तर ती व्यक्ती होमथिएटर लगेचच विकत घेईल आणि त्याच्या मनोरंजनाच्या साधनांमध्ये लगेच बदल दिसून येईल. परंतु सामाजिक प्रथा लवकर बदलत नाहीत. हुंडा, बालविवाह किंवा कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या सामाजिक प्रथा मोडून काढणे ही अतिशय संथ प्रक्रिया आहे. खोलवर रुजलेल्या प्रथा परंपरांचा बिमोड करून मुक्तता मिळवण्यासाठी दशके जावी लागतात.

**(७) नियोजित किंवा अनियोजित परिवर्तन :** अनियोजित या शब्दावरून आपल्या लक्षात येते की ज्यामध्ये कोणतेही नियोजन करून बदल केलेला नसतो असे परिवर्तन होय. हे अचानक होणारे परिवर्तन आहे. उदा., दुष्काळ, पूर, भूकंप, त्सुनामी इत्यादी यांसारख्या नैसर्गिक आपत्ती. जेव्हा एखादी नैसर्गिक आपत्ती येते तेव्हा मानव, प्राणिजात तसेच संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होते. अशा आपत्तीग्रस्त लोकांसाठी तत्परतेने पुनर्वसन कार्यक्रम आखणे आणि त्याची अंमलबजावणी करावी लागते.

नियोजनबद्ध परिवर्तन जाणीवपूर्वक नियोजन करून घडवून आणले जाते. आपण भारतातील शहरांचे असलेले नियोजन बघूया. या नियोजनामध्ये रहिवास, बागबगीचा, मैदाने, उपासनेच्या जागा, व्यवसाय किंवा कारखानदारीसाठी जागा, आर्थिक प्रदेश आणि इतर जागांसाठी स्थाननिश्चिती केलेली असते.



नियोजित शहर

## ८.२ सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत असणारे घटक

सामाजिक परिवर्तनासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत असणारे घटक हे वेगवेगळ्या श्रेणीअंतर्गत येतात जे नेहमी एकाच प्रकारचे नसतात. सामाजिक परिवर्तन हे अधिकाधिक घटकांमध्ये घडणाऱ्या आतंरक्रियांमुळे होते. सामाजिक परिवर्तनाच्या महत्त्वपूर्ण घटकांची माहिती पुढीलप्रमाणे :

**(१) भौतिक घटक :** या घटकाला भौगोलिक किंवा नैसर्गिक घटक असेही म्हणतात. भौतिक घटकांमध्ये हवामानाची स्थिती, भौतिक वातावरण, प्राणिजीवन, जैवविविधता, खनिजांचे स्रोत, नैसर्गिक स्रोत (नद्या, वनसंपत्ती, पर्वत) इत्यादी घटक येतात. या सर्व घटकांचा मानवी जीवनावर खूप मोठा प्रभाव पडतो. भौतिक घटक हे काही प्रमाणात सामाजिक परिवर्तनावर मर्यादा आणतात किंवा अवलंबून असतात. सामाजिक परिवर्तनाचा वेग आणि दिशा ही भौतिक वातावरणाने नियंत्रित होत असते. उपासमार किंवा दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीचाही मानवी जीवनावर दुष्परिणाम होत असतो. १९९३ मध्ये महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील भूकंपामुळे अनेक कुटुंबे विस्थापित झाली व त्याचे अनेकांना दीर्घकालीन परिणाम भोगावे लागले.

जरी असे असले तरी मानवी वसाहतींसाठी भौगोलिक परिस्थिती अनुकूलही असते. निरोगी भौतिक वातावरणामुळे मानवी समाज किती प्रगत झाला आहे याची असंख्य उदाहरणे देता येतील. उदा., जेथे पावसाचे मुबलक प्रमाण आहे, कसदार जमीन आणि खनिज संपत्ती आहे अशा ठिकाणी लोक राहतात आणि प्रगती करतात.

दुसरीकडे, मानवी वर्तनाचादेखील भौतिक वातावरणावर परिणाम होत असतो. 'विकासाच्या' नावाखाली चालणाऱ्या मानवी वर्तणुकीमुळे भौतिक पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम झालेला दिसतो. उदा. औद्योगिक प्रदूषणाचा वातावरणावर होणारा परिणाम आणि त्या अनुषंगाने जागतिक तापमान वाढीवर होणारा परिणाम, वितळत चाललेले ध्रुवांवरील बर्फ, समुद्राच्या पाण्याच्या पातळीत होणारी वाढ, काही समुद्रकिनाऱ्यांची लुप्त होत चाललेली जमीन/बेटे,



भूकंप

मर्यादित संसाधनांचे आव्हान या सर्वांचा मानवी जीवनमानाच्या दर्जावर परिणाम होतो. त्यामुळे आजच्या परिस्थितीत सर्वांनी शाश्वत विकासाच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांना प्रोत्साहन द्यायला हवे.

**उपक्रम – २**

तुम्ही सामाजिक परिवर्तनातील भौतिक घटकांचा अभ्यास केला. आता नैसर्गिक आपत्तींचा मानव आणि सामाजिक जीवनावर कसा परिणाम होतो ते योग्य उदाहरणांसह लिहा.

**(२) जैविक घटक :** या घटकालाच लोकसांख्यिक घटक असेही म्हणतात.

**लोकसंख्याशास्त्र :** लोकसंख्याशास्त्र म्हणजे लोकसंख्येचा सांख्यिकीय अभ्यास होय. यामध्ये लोकसंख्येचा आकार, संरचना, लोकसंख्येचे वितरण या सर्वांचा समावेश होतो. तसेच यामध्ये काळानुसार आणि स्थानानुसार जन्म, मृत्यू, वार्ध्यक्य, स्थलांतर याच्या संदर्भात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या बदलाची नोंद ठेवली जाते.

जैविक मर्यादेमध्ये जे घटक समाविष्ट आहेत ते म्हणजे सामाजिक सातत्य, चिरस्थायी भाव किंवा शाश्वतता, लोकसंख्येची वाढ किंवा घट, स्थलांतर आणि स्पर्धा.


जैविक घटकांमुळे प्रभावित होणाऱ्या गोष्टी म्हणजे लोकसंख्या, लिंगरचना, जन्म आणि मृत्यू दर, प्रजनन क्षमता, पिढ्यानपिढ्या चालत आलेली वंशपरंपरागत गुणवत्ता होय. लोकसंख्येची व्याप्ती किंवा आकार आणि रचना हे घटकही सामाजिक परिवर्तन घडवण्यास कारणीभूत ठरतात.

अन्न, निवारा, बेकारी, निकृष्ट आरोग्य, गरिबी, राहणीमानाचा निकृष्ट दर्जा इत्यादी समस्या या लोकसंख्येतील बदलावर थेट परिणाम करतात. तसेच अति लोकसंख्या किंवा कमी लोकसंख्येचाही देशाच्या विकासावर परिणाम होत असतो. यामुळे प्रादेशिक असमतोल, घनतेमध्ये बदल, लिंग गुणोत्तरात असणारी तफावत हे सर्व समाजावर परिणाम करतात. लोकसंख्येच्या आकारमानामुळे सामाजिक, आर्थिक विकास आणि संधींची उपलब्धतता यावर परिणाम होतो. उदा., काही समाजांतील ज्येष्ठ नागरिकांची वाढती लोकसंख्या आणि युवकांची घटती संख्या **हे** त्या समाजासाठी नवीन आव्हाने निर्माण करतात.

**लिंग गुणोत्तर:** लिंग गुणोत्तर म्हणजे कोणत्याही लोकसंख्येमध्ये दरहजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या होय.

**हे माहिती आहे का?**

| वर्ष | संपूर्ण लोकसंख्येमधील लिंग गुणोत्तर | लहान बालकांमधील लिंग गुणोत्तर |
|---|---|---|
| १९९१ | ९२७ | ९४५ |
| २००१ | ९३३ | ९२७ |
| २०११ | ९४० | ९१४ |




भारतातील विषम लिंगगुणोत्तराचा आलेख

**(३) सामाजिक-सांस्कृतिक घटक :** मानवी संस्कृती ही परिवर्तनाची एक प्रक्रिया आहे. समाजाच्या एका सांस्कृतिक घटकात होणारे परिवर्तन संपूर्ण सामाजिक बदलासाठी कारणीभूत होऊ शकते. जेथे दोन संस्कृती या समोरासमोर येतात किंवा भिडतात तेथे सामाजिक परिवर्तन अपरिहार्य असते. सांस्कृतिक

प्रसरण हा परिवर्तनाचा एक स्रोत आहे. संस्कृतीमध्ये मूल्ये, प्रमाणके, कल्पना आणि विचारधारा, नैतिकता, रीतिरिवाज आणि परंपरा या येतात. हे सर्व परिवर्तनाचे घटक आणि कारणे देखील आहेत.

सामाजिक परिवर्तनामध्ये सांस्कृतिक मूल्ये आणि विचारप्रणाली किती महत्त्वाची भूमिका बजावतात हे काही उदाहरणांवरून स्पष्ट होते. जीवशास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन, मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉईड आणि विचारवंत कार्ल मार्क्स यांनी मागील शतकामध्ये संपूर्ण जगामध्ये मांडलेल्या काही महत्त्वपूर्ण संकल्पनांचा प्रभाव आजही कायम टिकलेला दिसून येतो. विचार आणि सांस्कृतिक मूल्यांची सामाजिक परिवर्तनामध्ये काय महत्त्वाची भूमिका काय आहे हे समजून घेण्यासाठी आपण काही उदाहरणे बघू. जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबरने सामाजिक परिवर्तनातील सांस्कृतिक घटकाला महत्त्व दिले आहे. त्यांनी आपल्या 'Protestant Ethics and the Spirit of Capitalism' या प्रसिद्ध पुस्तकात प्रोटेस्टंट धर्माची शिकवण आणि भांडवलशाहीचा प्रसार याचा आंतरसंबंध दाखवून दिला आहे.

दुसरीकडे सांस्कृतिक मूल्यांचा नकारात्मक परिणामदेखील होऊ शकतो. धार्मिक कट्टरतावाद, जहालवादी विचार, रीतिरिवाज, अंधश्रद्धा, चुकीचा भौतिकवाद, निरुपयोगी मूल्ये असे विचारधारांचे काही नकारात्मक परिणाम हे अचानक उद्भवणारी संकटे आणि मानवी दुर्दशेमध्ये भर घालत असतात. हे परिवर्तनात अडथळे निर्माण करतात.

**(४) आर्थिक घटक :** सामाजिक परिवर्तनामध्ये या घटकाला खूप महत्त्व आहे. मानवी इतिहासातील आर्थिक विकासाचे टप्पे हे आर्थिक परिवर्तनाबरोबरच राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाचे देखील निर्देशक आहेत. प्रगत राहणीमान आणि मानवी कल्याण हाच आर्थिक परिवर्तनाचा मूलभूत हेतू असतो.

आर्थिक विकास हा विविध संस्थांवर परिणाम करतो. पहिल्या पाठामध्ये आपण औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक क्रांतीचा मानवी समाजावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला. मोठ्या उद्योगांचे वाढणारे प्रमाण, वाढते शहरीकरण, रोजगाराच्या संधी, व्यावसायिकता, पिळवणूक, व्यापारातील संघटनवाद आणि इतर गोष्टींना चालना देते.

आर्थिक स्पर्धेमधून वर्गसंघर्ष व वाढणारा भौतिकवाद अशा गोष्टी निष्पन्न होतात. अलीकडच्या काळात वर्गांमध्ये सतत विभाजन होताना दिसते. कार्ल मार्क्सचा प्रसिद्ध 'वर्ग संघर्ष सिद्धान्त' हा दुसऱ्या पाठामध्ये चर्चिला गेला आहे. सामाजिक परिवर्तन आणि समाजातील अन्यायाविरुद्ध असणाऱ्या चळवळी समजून घेण्यासाठी 'संघर्षात्मक दृष्टिकोन' हा महत्वपूर्ण भूमिका पार पाडतो. उदा., शेतकरी चळवळ, स्त्रियांची चळवळ, कामगार चळवळ, उदारमतवादी चळवळ, समान हक्क चळवळ, विद्यार्थी चळवळ, आदिवासी चळवळ इत्यादी. संघर्षवादी विचारवंत संघर्ष हा समाजातील परिवर्तनाचा पाया मानतात. याउलट 'कार्यवादी दृष्टिकोन' हा समाजातील स्थिरता आणि समतोलावर अधिक भर देतो.

तुम्ही 'उत्तर-जागतिकीकरणाच्या' युगातील विद्यार्थी आहात. जागतिकीकरण ही भारतीय समाजावर मोठा परिणाम करणारी प्रक्रिया आहे. १९९१ मध्ये भारत सरकारने स्वीकारलेल्या उदारमतवाद, खाजगीकरण, जागतिकीकरणाच्या धोरणाचा (LPG) आपल्या राजकीय संस्था, अर्थव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, शिक्षणव्यवस्था इत्यादींवर दूरगामी परिणाम झाला आहे.

**उपक्रम – ३**

जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेऊन आपल्या सभोवताली जागतिकीकरणामुळे काय काय बदल घडले आहेत त्याचे निरीक्षण करा.

**(५) तांत्रिक घटक :** एखाद्या समाजातील तांत्रिक प्रगती हा त्या समाजाच्या सभ्यतेचा मोठा मापदंड समजला जातो. मात्र, आज विकासातील तंत्रज्ञानाच्या भूमिकेबद्दल खूप चर्चा सुरू आहे. 'विकास' म्हणजे काय? विकास कोणासाठी? विकासासाठी किती किंमत मोजावी लागते? हे सर्व प्रश्न आज उपस्थित केले जात आहेत. तरीदेखील हे मान्य करावे लागेल की, तंत्रज्ञान हा मानवी प्रगतीचा निर्विवाद घटक आहे.

मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनावर तांत्रिक बदलांचा परिणाम होत असतो. उदा., भारतामध्ये ब्रिटिश काळापासून दळणवळण आणि संपर्क साधनांची व्यवस्था आहे. त्याकाळी असणाऱ्या वसाहतींची गरज या सेवा भागवत असतील परंतु त्यानंतरही नवीन व्यवस्था उपयोगात येत आहेत. पुढील काळात भारत सरकारने या सेवा विस्तारित आणि विकसित केल्या आहेत.

आपले दैनंदिन जीवन हे तंत्रज्ञानाच्या परिणामाने मोठ्या प्रमाणावर प्रभावित होत आहे. आपल्या घरापासून ते कामाच्या जागेपर्यंत, खेळ, मनोरंजन, मतदान, बँकींग, ई-कॉमर्स, ई-बिझिनेस, ई-गव्हर्नन्स, प्रवास इत्यादी. नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधामुळे, आज ई-लर्निंग, ई-लायब्ररी, ई-कॉमर्स, ई-टिकिटींग, ऑनलाईन मार्केटिंग, ऑनलाईन परीक्षांमधील संधी हे शक्य झाले आहे.


मेट्रो प्रकल्प

आपण डिजिटल युगामध्ये राहत आहोत. एका बाजूला आपण नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहोत, तर दुसऱ्या बाजूला रोज उपाशी झोपणारे, आरोग्याची काळजी न घेऊ शकणारे, उत्तम शिक्षण न मिळू शकणारे किंवा ज्यांना निवाराच नाही असे लोकही आहेत ही खंत आहे. डीजिटायझेशन मुळे अशा गरजू लोकांपर्यंत पोहचण्यात सरकारला मदत होत आहे.

**उपक्रम - ४**

सामाजिक परिवर्तनातील तांत्रिक घटकाचे महत्त्व तुम्हांला समजले असेल. आता, तुम्ही तुमच्या शेजारील दहा कुटुंबांच्या रोजच्या जीवनात आधुनिक तंत्रज्ञानाचा त्यांना कसा उपयोग होतो याची माहिती गोळा करा.

**(६) शैक्षणिक घटक :** शिक्षणाबाबतचे दुर्लक्ष, जागरूकतेची कमतरता आणि अनास्था हे परिवर्तनात अडथळे निर्माण करतात. विविध साधनांद्वारे शिक्षण-औपचारिक शिक्षण, सहज शिक्षण, अनौपचारिक शिक्षण आणि खुले किंवा दूरशिक्षण अशा शिक्षणाच्या संधी आज उपलब्ध आहेत.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

शिक्षण हे कल्पनांच्या आणि कौशल्यांचा विकासाचे, समस्या सोडवण्याचे, लोकांना परिवर्तित करण्याचे साधन आहे. शिक्षणातून लोक ज्ञान, कौशल्य, कार्यक्षमता मिळवतात आणि त्याचा उपयोग नोकरी किंवा स्वतःच्या व्यवसायासाठी करतात. शिक्षणाच्या हक्काच्यामार्फत (RTE) समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचवण्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले आहेत.

शिक्षणाचा हेतू, त्याची सामग्री, त्याच्या अध्यापन पद्धती हे सर्व आज बदलत आहेत. तंत्रज्ञानाचा शिक्षणामध्ये केला जाणारा उपयोग-, ई-लर्निंग, ऑनलाईन शिक्षण (उदा., MOOCS), स्मार्ट बोर्डस्, आभासी वर्ग, नॅशनल डिजिटल लायब्ररी इत्यादीद्वारे शिक्षण अगदी दूरपर्यंत पोहचले आहे.

सरकारच्या प्रयत्नांमुळे बऱ्याच लोकांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे.

लिंगबदल करणाऱ्या व्यक्तींना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) विशेष प्रयत्न केले आहेत. अनेक विद्यापीठांनी अभ्यासक्रमांसाठी लिंगबदल केलेल्या व्यक्तींना प्रवेश देण्यास सुरुवात केली आहे. गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना बऱ्याच समाजसेवकांमार्फत शिष्यवृत्ती दिली जाते. शिक्षण मानवाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणते.

**उपक्रम - ५**

मागील १० वर्षांतील शिक्षणाच्या परिवर्तनाबद्दल माहिती मिळवा. (उदा., Teach for India Campaign)

मानवी समाजामध्ये सतत परिवर्तन होत असते. या पाठामधून सामाजिक परिवर्तन म्हणजे काय हे समजले असेल तसेच सामाजिक, परिवर्तनाच्या जैविक, सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, तांत्रिक आणि शैक्षणिक घटकांची ओळख देखील तुम्हांला झाली आहे. आपल्या आसपासचे बदल समजून घ्यायला तुम्हांला निश्चितच या पाठाचा उपयोग होईल.

## सारांश

- मानवी जीवन गतिशील प्रक्रियेतून जात आहे. परिवर्तन सर्वत्र दिसून येणारा घटक आहे. परिवर्तन हे अपरिहार्य आहे.
- समाजशास्त्र हे समाजाचा सांख्यिकी आणि गतिशील दृष्टिकोनातून अभ्यास करते.
- समाजशास्त्र समाजाचा संरचनात्मक आणि कार्यात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करते. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील संरचना आणि कार्यात्मकता यामध्ये दिसून येणारे बदल.
- सामाजिक परिवर्तनाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत : सतत चालणारी प्रक्रिया, तात्पुरता गुण, एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या घटना, नैतिक तटस्थता, कमी कालावधी आणि जास्त कालावधीसाठी परिवर्तन, नियोजित आणि अनियोजित परिवर्तन इत्यादी.
- सामाजिक परिवर्तनासाठी अनेक घटक कारणीभूत ठरतात. सामाजिक परिवर्तन केवळ एकाच घटकावर अवलंबून नसते.
- समाजामध्ये परिवर्तनासाठी कारणीभूत घटक- भौतिक किंवा भौगोलिक घटक, जैविक घटक, सामाजिक-सांस्कृतिक घटक, आर्थिक घटक, तांत्रिक घटक आणि शैक्षणिक घटक.

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. सामाजिक परिवर्तन ही संज्ञा ......... आहे.
(मूल्ययुक्त, नैतिक, पूर्वग्रहित)

२. भूकंपाचा लोकांवर होणारा परिणाम हा .......... परिवर्तनाचा घटक आहे.
(भौगोलिक, जैविक, सांस्कृतिक)

३. लिंगगुणोत्तराचा अभ्यास हा .......... परिवर्तनाचा घटक आहे.
(जैविक, तांत्रिक, नैसर्गिक)

४. एखाद्या शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रम हे ...... सामाजिक परिवर्तनाचे उदाहरण आहे.
(नियोजित, अनियोजित, क्रांतीकारी)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) भूकंप - भौतिक घटक
(ii) धार्मिक कट्टरतावाद - जैविक घटक
(iii) वाढते शहरीकरण - आर्थिक घटक
(iv) ई-गव्हर्नन्स - तांत्रिक घटक

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| भौतिक घटक, शैक्षणिक घटक, आर्थिक घटक |
|---|

१. किनारपट्टीच्या प्रदेशामध्ये वाढणारी समुद्राच्या पाण्याची पातळी -

२. लैंगिक शोषणाविषयीच्या समस्येविषयी जाणीवजागृती निर्माण करण -

**(ड) अधोरेखित शब्दांच्या जागी योग्य शब्द लिहून विधान पूर्ण करा.**

१. सामाजिक परिवर्तन फक्त <u>एकरेषीय</u> असते.

२. सर्व शिक्षकांनी वर्गामध्ये एखादा भाग शिकवताना पूर्वतयारी करणे, हे <u>अनियोजित</u> परिवर्तनाचे उदाहरण आहे.

**प्र.२ फरक स्पष्ट करा.**

१. नियोजित परिवर्तन-अनियोजित परिवर्तन

२. अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिवर्तन

**प्र.३ पुढील संकल्पना उदाहरणासहित स्पष्ट करा.**

१. सामाजिक परिवर्तन

२. अल्पकालीन परिवर्तन

**प्र.४ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**

प्रत्येक संकल्पनेमधील परिवर्तनाचा महत्वपूर्ण घटक ओळखा.

| | |
|---|---|
| शोध | |
| भूकंपाचे परिणाम | |
| घसरत जाणारे लिंगगुणोत्तर | |
| विद्यार्थी अदलाबदल कार्यक्रम (Student exchange programme) | |

**(ब) खालील विधाने चूक की बरोबर हे सकारण स्पष्ट करा.**

१. माहिती नसणाऱ्या गोष्टींबद्दल असणारे पूर्वग्रह आणि भीती या परिवर्तनात अडथळा निर्माण करणाऱ्या गोष्टी आहेत.

२. सामाजिक परिवर्तनाचे अचूक अंदाज वर्तवता येतात.

**प्र.५ आपले मत नोंदवा.**

१. तुमच्या स्थानिक भागात घडलेला महत्वपूर्ण बदल सांगा जो तुमच्या मते परिवर्तनाचा परिणाम आहे.

२. 'स्वच्छ भारत अभियान' याचा समाजावर सकारात्मक परिणाम झाला आहे, असे तुम्हांला वाटते का? तुमचा अनुभव लिहा.

**उपक्रम**

गेल्या एका दशकामध्ये युवकांच्या वेशभूषेमध्ये किंवा खानपान पद्धतीत कसा फरक पडला आहे यावर छायाचित्र निबंध (photo essay) तयार करा.

***